एकमत
दिनांक १७ सप्टेंबर २०१८

# शिक्षणाबरोबरच व्यवहार ज्ञान माहित करून घ्यावे : कुलकर्णी

## स्वेरीत 'अभियंता दिन' तर 'ऑलंम्पस २०१८'चे उद्घाटन



प्रतिनिधी/पंढरपूर

'विज्ञान आणि तंत्रज्ञान विषय अभ्यासताना मनात एक प्रकारचे कुतूहल निर्माण होते त्यामुळे अनेक प्रश्नांच्या उत्तरांचा शोध घ्यावा लागतो, यातून संशोधनाची निर्मिती होते त्यामुळे विद्यार्थ्यांनी शिक्षण घेताना अथवा नवीन गोष्टी करताना त्यात कुतूहल जागृत ठेवल्यास सर्वांगीण विकास शक्य होऊ शकतो. यासाठी विद्यार्थ्यांनी प्रगतीसाठी पुस्तकी ज्ञानाबरोबरच व्यवहारज्ञानदेखील जाणून घ्यावे. त्यामुळे बाहेरील विश्वातील अनुभव घेऊन आपल्याला समाजात वावरताना आवश्यक ज्ञान मिळू शकते. यासाठी नवअभियंत्यांनी सामाजिक बांधिलकी जोपासून आपले ज्ञान वाढवावे, असे प्रतिपादन फ्लीटगार्ड फिल्टर्स प्रा. लिमिटेडचे सी.एफ.ओ. कंपनी सचिव आणि प्रमुख एच. आर. संजय कुलकर्णी यांनी केले.

येथील श्री विठ्ठल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, पंढरपूर संचलित अभियांत्रिकी महाविद्यालयात आयोजित केलेल्या 'अभियंता दिनी' व 'ऑलंम्पस २०१८' या राष्ट्रीय संशोधन स्पर्धा कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून फ्लीटगार्ड फिल्टर्स प्रा. लिमिटेडचे सी.एफ.ओ., कंपनी सचिव आणि प्रमुख एच. आर. संजय कुलकर्णी हे उपस्थितांना मार्गदर्शन करत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विश्वस्त दादासाहेब रोंगे होते. प्रारंभी भारतरत्न डॉ. मोक्षगुंडम् विश्वेश्वरय्यांच्या प्रतिमेच्या पूजनानंतर संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांनी संस्थेची संपूर्ण माहिती देऊन प्रास्ताविक केली. 'ऑलंम्पस २०१८' चे विद्यार्थी अध्यक्ष सिद्धार्थ उबाळे यांनी स्पर्धेची संपूर्ण नियमावली व सविस्तर माहिती दिली. यावेळी कांचन बागल, श्वेता कदम, सहसचिवा ऐश्वर्या मासाळ यांनी देखील अभियंता दिनाबाबत मत व्यक्त केले.

यावेळी सूरज रोंगे, पैठणकर, प्राचार्य डॉ. एन. डी. मिसाळ, प्राचार्या डॉ. एस. डी. सोनवणे, उपप्राचार्य डॉ. एस. एन. कुलकर्णी, 'ऑलंम्पस २०१८' चे समन्वयक प्रा. डी. टी.काशीद, सांस्कृतिक कार्यक्रम विभागप्रमुख प्रा. करण पाटील, सचिवा दीपान्विता डेब, खजिनदार नितीन कदम, ज्ञानराज तेलंग, विविध विभागाचे प्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन ऋतुराज जाधव व आकांक्षा पाटील यांनी केले. विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. अभय उत्पात यांनी आभार मानले.




Shri Vithal Educat... esearch Institute's
A Series of National Level Events
Olympus 2k18
15th - 16th September 2018
SVERI
Engineering for Excellence
ISTE
INDIAN SOCIETY FOR TECHNICAL EDUCATION